Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VIII Issue – III May - June 2019

# फ्रेडरिक फ्रोबेल

**श्री. अमरदीप अशोक रामराजे**
*सहाय्यक प्राध्यापक*
*मातोश्री शिक्षणशास्त्र महाविद्यालय, एकलहरे, नाशिक*

फ्रेडरिक फ्रोबेल हे बालोद्यान शैक्षणिक पद्धतीचे जनक समजले जातात. या पद्धतीचा संपूर्ण जगभर प्रसार झालेला आहे. फ्रेडरिक फ्रोबेल यांचा जन्म जर्मनीतील ओबरबीसवाच या गावातला आहे. त्यांचे वडील धर्मोपदेशक होते. त्यांना लहानपणापासून निसर्ग प्रेम व तात्त्विक विचारांची सवय लागलेली होती. त्यांचा आवडता पेशा म्हणजे शिक्षक होय. त्यांनी कीलहान येथे प्राथमिक शाळेची स्थापना केली, पण त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे इथे यश प्राप्त झाले नाही. त्यामुळे त्यांनी स्वित्झर्लंडला जाऊन तेथील शाळांच्या कार्यपद्धतीबद्दल माहिती गोळा केली त्यांनी जर्मनीत परत आल्यानंतर पहिल्या बालोद्यान शाळेची स्थापना केली.

फ्रेडरिक फ्रोबेल यांनी बालोद्यान शाळेच्या विकासासाठी खूप प्रयत्न केले शिक्षक व शिक्षण पद्धतीच्या विकासासाठी त्यांचे प्रयत्न हे मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या शिक्षण पद्धतीला जर्मनीत विरोध झाला. स्थापन केलेल्या शाळा बंद करण्यात आल्या. याचा त्यांना फारच मानसिक त्रास झाला.

फ्रेडरिक फ्रोबेल यांचे काही ग्रंथ ते पुढीलपमाणे –

1. Education by Development
2. Pedagogics of Kindergarten
3. The Education of Man

फ्रेडरिक फ्रोबेल यांचे शैक्षणिक विचार

फ्रेडरिक फ्रोबेल यांच्या मते शिक्षण म्हणजे आंतरिक विकास होय. बालकाचे नैतिक, बौद्धिक विकास व त्यांचे संवर्धन हे त्यांच्या आंतरिक प्रेरणेतून व्हायला हवे. फ्रेडरिक फ्रोबेल यांनी बालकाच्या शिक्षणासाठी ज्ञानाला व विकासाला अधिक महत्त्व दिले आहे. अध्यापक हा त्यांना गौण वाटतो. बालकाच्या सृजनशील गुणांचा विकास हा शिक्षणाद्वारे व्हायला हवा. बालक हे स्वयंस्फूर्तीने व कल्पनेने नवनवीन चित्रे काढून त्याची कल्पकता सादर करत असतो. बालपण हे त्याचे स्वयं मूल्य असून ती त्याची स्वतःची एक अशी कृती होय. व्यक्तीने प्रथम बालकाला समजून घेणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे त्याला मार्गदर्शन करणे गरजेचे ठरते. जागतिक एकतेसाठी व मानवतेसाठी शिक्षणाची आवश्यकता असते. फ्रेडरिक फ्रोबेल यांचे शैक्षणिक विचार हे अध्यात्मावर आधारित असे आहेत. त्यांच्या मते ज्ञान हे आत्मसात केलेली व योग्य परस्पर संबंधात मांडलेली

माहिती होय. बालकाला क्रीडेद्वारे शिक्षण देणे आवश्यक आहे. अध्यात्मिक, बौद्धिक विकास घडवून आणायचा असेल तर क्रीडेद्वारे विविध उपक्रम राबवणे गरजेचे ठरते. त्यामुळे व्यक्तीच्या विविध हालचालींना एक कार्य प्राप्त होते व गती प्राप्त होते. खेळाचे बालकाच्या विकासात व मानवी विकासात फार महत्त्वाचे स्थान आहे. कारण त्यामुळे आत्म्याचे प्रकटीकरण आणि भावनांचे व्यक्त करण्याचे साधन ठरते.

**फ्रेडरिक फ्रोबेल यांची बालोद्यान पद्धतीचे वैशिष्ट्ये –**

1. शारीरिक विकास.
2. स्नायूंचा व्यायामासाठी संधी.
3. स्नायूव्दारे निसर्गाची ओळख.
4. भावना आणि प्रेम जागृत करण्यासाठी योग्य मार्गदर्शन.
5. बालकांना जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणणे.
6. बालकांमध्ये एकता निर्माण करणे.

**बालोद्यान शिक्षण पद्धतीचे वैशिष्ट्ये**

बालोद्यान शिक्षण पद्धतीमध्ये स्वयंकृतीला महत्त्व देण्यात आले आहे. बालक स्वतः शब्द जोडतो. स्वकृतीद्वारे आत्मविष्कार घडवून आणतो. या पद्धतीमध्ये शिक्षण आणि आत्मविश्वास यांचा एकत्रित संबंध जोडून बालकांचा विकास होतो. अनेक भावनांच्या एकत्रित करण्याद्वारे बालक नैसर्गिकरित्या स्वयंकृतीने शिकत असतो. बालकांना या पद्धतीमध्ये गाणी म्हणायला लावतात या गाण्यामुळे ओठांना आणि इंद्रियांना हालचाल करण्यास वाव मिळतो या गाण्यांच्या माध्यमातून भाषेचा विकास व वापर करण्यास संधी प्राप्त होते. बालोद्यान पद्धतीमध्ये शिक्षक हा कृतिशील असतो. शिक्षकाने बालकांना दिशादर्शनाचे कार्य करायचे असते. कधीकधी त्यांनी स्वतः जाऊन विद्यार्थ्यांना दाखवावे त्यामुळे विद्यार्थ्यांना त्याबद्दलची खरी कल्पना येते. या शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षकाला महत्त्वाचे स्थान आहे. या शिक्षणपध्दतीमध्ये भाषा, गणित, चित्रकला, शारीरिक शिक्षण, व्यवसाय शिक्षण यांना प्रामुख्याने महत्त्व देण्यात आलेले आहे. विचार जाणून घेण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे भाषा त्याचबरोबर शब्दांची ओळख करून देण्यासाठी गाणी या माध्यमांचे सहाय्य घ्यावे लागते. सृजनशीलतेचा विकास करण्यासाठी विविध व्यवसाय उदाहरणार्थ मातीकाम, कागदकाम यांची मदत होते. बालकांवर चांगले संस्कार करण्यासाठी त्यांच्या वर्तनात योग्य असे बदल घडवून आणण्यासाठी प्रार्थना, ऐतिहासिक गोष्टी यांचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आलेला असतो. शिक्षकाने विद्यार्थ्यांना शिकवताना त्यांच्याशी प्रेमाने वागणे आवश्यक आहे. शिक्षणाचे कार्य ही महत्त्वाची जबाबदारी शिक्षकाला पूर्ण करावी लागते. विद्यार्थ्यांना शाळेविषयी अभिरुची

निर्माण करण्याचे सहाय्य शिक्षकाने करणे गरजेचे असते. शिक्षकांनी प्रेम, सहानुभूतीने बालकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे आवश्यक आहे. शिक्षकाने बालकांना शारीरिक शिक्षा करू नये, प्रेम भावनेतून समजूतदारपणे बालकांना शिस्तीची ओळख करून द्यावी.

फ्रेडरिक फ्रोबेल यांचे शैक्षणिक कार्य

फ्रेडरिक फ्रोबेल हे पेस्टॉलॉजी यांचे शिष्य होय. त्यांनी पेस्टॉलॉजींशी चर्चा करून शिक्षण पद्धतीत बदल केले. त्यांनी बालोद्यान शैक्षणिक पद्धती शोध लावला. या बालोद्यान पध्दतीचर पहिली शाळा 1837 साली ब्लॅकेनवर्ग येथे स्थापन केली. त्यांनी आपले विचार सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध ठिकाणी व्याख्याने दिली. बालकाचा विकास करण्यासाठी त्यांना मार्गदर्शनाची आवश्यकता असते असे त्यांचे मत होते. शिक्षण पद्धतीमध्ये क्रीडेला फार महत्त्व होते. क्रीडा हे आत्मविश्वासाचे प्रभावी असे साधन ओळखले जाते म्हणून फ्रोबेल यांनी शिक्षण पद्धतीत क्रियेचा अंतर्भाव केलेला दिसतोय. या पद्धतीमध्ये बालकांना जास्तीत जास्त खेळण्यास वाव दिलेला आहे. या शिक्षण पद्धतीमध्ये कृतीला महत्त्व देण्यात आलेले आहे. फ्रोबेल यांनी शिक्षण घेण्यासाठी इंद्रियांच्या वापरास महत्त्वाचे स्थान दिले आहे. ज्ञान ग्रहण करणे आणि त्यांचा विकास करणे हे इंद्रिय मदत करत असतात. याच विचारांना फ्रेडरिक फ्रोबेल यांनी महत्त्वाचे मानले आहे. माहितीची योग्य ज्ञानात रूपांतर करून स्वतः मध्ये ठेवण्यासाठी ज्ञानेंद्रियांची मदर चांगल्या प्रकारे होत असते. बालकाचा विकास म्हणजे व्यक्तिविकास व हा विकास बहुतेक मानसिक, शारीरिक असा असतो.

**संदर्भसूची –**

1. घोरमोडे, के.यु व घोरमोडे, क.क. ( 2012 ). शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य, नागपुर : विद्या प्रकाशन
2. https://www.britannica.com/biography/Friedrich-Froebel
3. https://en.wikipedia.org/wiki/Friedrich_Frobel